महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३० वे | दिनांक : २१/०१/२०२६ वार : बुधवार

## भाजप कार्यकर्त्यांचा 'युती तोडा'चा नारा



**छत्रपती संभाजीनगर :** आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर 'कीज हॉटेल' येथे भाजप आणि शिवसेनेच्या नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली असून, या बैठकीनंतर महायुतीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. यापूर्वी महानगरपालिका निवडणुकीत तब्बल 12 बैठका होऊनही शेवटच्या क्षणी युती तुटली होती, ज्यामध्ये भाजपने मोठे यश मिळवले होते मात्र शिवसेनेला अपेक्षित यश मिळाले नव्हते. आता पुन्हा एकदा दोन्ही पक्षांनी एकत्रित निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला असला, तरी या घोषणेनंतर भाजप कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याचे पाहायला मिळत असून, मागील कटू अनुभवांच्या पार्श्वभूमीवर या नव्या युतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

भाजप नेते व मंत्री अतुल सावे, खासदार भागवत कराड, आमदार संजय केनेकर आणि शिवसेनेचे पालकमंत्री संजय शिरसाठ, खासदार संदिपान भुमरे, आमदार रमेश बोरणारे, आमदार संजना जाधव यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत महायुतीची अधिकृत घोषणा करण्यात आली. मात्र या निर्णयामुळे वैजापूरमधील भाजप कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. युतीला कडाडून विरोध करत या कार्यकर्त्यांनी 'युती तोडा' अशी मागणी लावून धरली आणि थेट मंत्री अतुल सावे यांच्या गाडीला घेराव घालत जोरदार घोषणाबाजी केली. जिल्ह्याच्या राजकारणात वरिष्ठ पातळीवर युती निश्चित झाली असली, तरी स्थानिक कार्यकर्त्यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे महायुतीसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

भाजप नेते अतुल सावे आणि शिवसेनेचे संजय शिरसाट यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत जिल्हा परिषद निवडणुकीसाठी महायुतीची अधिकृत घोषणा केली. या जागावाटपानुसार भाजपला 27 तर शिवसेनेला 25 जागा मिळाल्या आहेत. मात्र, ही जागावाटपाची चर्चा अत्यंत तणावपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीत जागांच्या मुद्द्यावरून मतभेद झाल्याने संजय शिरसाट संतापून बाहेर आले होते, परंतु शिवसेनेचे ज्येष्ठ नेते संदीपान भुमरे यांनी त्यांची समजूत काढून त्यांना पुन्हा चर्चेसाठी प्रवृत्त केल्याची माहिती समोर आली आहे.

दुसरीकडे, युतीची घोषणा होताच भाजप कार्यकर्त्यांनी मोठा गोंधळ घालत आपली नाराजी उघडपणे व्यक्त केली. दोन्ही पक्षांमध्ये इच्छुक उमेदवारांची संख्या मोठी असल्याने प्रत्येक गट अधिक जागांसाठी आग्रही होता. कार्यकर्त्यांच्या मते, हा निर्णय त्यांच्यावर लादण्यात आला असून त्यांनी या युतीला तीव्र विरोध दर्शवला आहे. नेत्यांनी जरी एकीचा संदेश दिला असला, तरी कार्यकर्त्यांमधील हा असंतोष आणि जागावाटपावरून झालेला वाद आगामी काळात महायुतीसमोर मोठे आव्हान उभे करू शकतो.

## अहिल्यादेवींची प्रतिमा तोडून हिंदूंचा अपमान : नाना पटोलेंचा हल्लाबोल



**नागपूर :** कॉंग्रेस नेते नाना पटोले यांनी पत्रकार परिषद घेत महापालिका निवडणुकीच्या निकालांवर भाष्य करत सरकारवर टीका केली. तसेच आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुका बॅलेट पेपेरवर घेण्यात यावी अशी मागणी त्यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे. तसेच मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचे काम सरकारकडून सुरू झाले असून उद्या मुंबई केंद्रशासित झाली तर त्यात नावीन्य वाटायला नको, असा गंभीर आरोपही पटोले यांनी केला आहे. तसेच अहिल्याबाई होळकरांची प्रतिमा तोडून भारतातील हिंदूंचा अपमान करण्याचे काम या मोदी सरकारने केले असल्याची टीका नाना पटोले यांनी केली आहे.

नाना पटोले म्हणाले, देशात हिंदू खतरेमध्ये आहेत असे वल्गना करणाऱ्या या ज्या हिंदुत्ववादी संघटना आहेत, त्यांना आम्ही काय बोलावे, पण या ठिकाणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांच्या प्रतिमेला तोडून महाराष्ट्राचाच नव्हे, महाराष्ट्रातील धनगर समाजाचाच नव्हे, तर संपूर्ण भारत देशातल्या हिंदूंचा अपमान करण्याचे पाप या मोदी आणि योगी सरकारने केले आहे. ही आमची भूमिका आहे.

महानगरपालिकेच्या निवडणुकीवर भाष्य करताना नाना पटोले म्हणाले, मतदार यादीत घोळ झाला होता आणि म्हणून आम्ही निवडणूक आयोगाला सांगितले होते की मतदार याद्या पारदर्शक करावी, जी शाई लावण्यात आली ती कशी पुसली जाते ते तुमच्या माध्यमातून पाहिले आणि दुसरे महत्त्वाचे म्हणजे ईव्हीएमवर आता लोकांचा विश्वास राहिलेला नाही. त्यामुळे मतदान करायला जायचेच कशाला, हा जो अविश्वास मतदान प्रक्रियेवर जो झाला आहे त्यामुळे अनेक राज्यांमध्ये बॅलेटवर निवडणुका घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे आता जिल्हा परिषदेच्या निवडणुका ज्या आहेत, त्या निवडणुका बॅलेटवर घेण्यात याव्यात, अशी मागणी आम्ही निवडणूक आयोगाकडे आणि राज्य सरकारकडे केली आहे. तसेच लोकांमध्ये जो अविश्वास निर्माण झाला आहे तो राज्य निवडणूक आयोगाने दूर करावा, अशी आमची मागणी आहे.

पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले, मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचे काम दिल्लीत बसलेल्या सरकारने सुरू केले आहे. उद्याच्या काळात जर मुंबई केंद्रशासित झाले तर हे नावीन्य ठरणार नाही. त्या पद्धतीचा घाट केंद्र सरकारने घातलेला आहे. आर्टिकल 3 प्रमाणे केंद्र सरकारला त्याचे अधिकार आहेत. महापालिका आपल्या ताब्यात घेऊन आता मुंबईला वेगळे करण्याचे काम त्यांनी सुरू केले आहे. हा आरोप नाही, तर ही वस्तुस्थिती आहे. पालघर जिल्ह्यात ज्या पद्धतीने शेतकरी बांधवांना गुजराती भाषेत नोटीस दिल्या जात आहेत, याचाच अर्थ एकीकडे मराठी भाषेला अविभाज्य दर्जा देणे आणि दुसरीकडे मराठीचा अपमान करण्याचे पाप हे सरकार करत आहे.

## आपल्याला संपूर्ण मुंब्रा हिरवा करायचाय : एमआयएमची नगरसेवक सहर शेखचा हल्लाबोल



**ठाणे :** महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 30 मधून एमआयएम पक्षाची सहर शेख ही तरुणी निवडून आली आहे. सहर शेखचे वडील युनूस शेख आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यातील वाद सर्वश्रुत आहे. सहर शेखसाठी युनूस शेख यांनी राष्ट्रवादीतून उमेदवारी मागितली होती, मात्र ती नाकारण्यात आली होती. त्यानंतर सहर शेखने एमआयएमकडून उमेदवारी मिळवत निवडणुकीत दणदणीत विजय मिळवला. आता विजयी सभेत बोलताना शेख बाप-लेकीने जितेंद्र आव्हाड यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

विजयी सभेत बोलताना सहर शेख म्हणाली, आपण त्या लोकांच्या अहंकाराच्या चिंधड्या उडवल्या. काहींना वाटत होते आपण त्यांचे गुलाम आहोत, पण आमच्यासाठी फक्त अल्लाह सर्वोच्च आहे. आम्ही कोणाच्या बापाचे मिंधे नाही, असे म्हणत सहरने जितेंद्र आव्हाड यांना डिवचले. तसेच प्रभाग क्रमांक 30 मध्ये सगळ्यांनी भरभरून मतदान करून एमआयएमच्या उमेदवारांना जिंकवले. पाच वर्षांनी या ठिकाणी पुन्हा निवडणूक होईल, तेव्हा यापेक्षा मोठे प्रत्युत्तर द्यायचे आहे. संपूर्ण मुंब्रा आपल्याला हिरव्या रंगाने व्यापून टाकायचा आहे. या लोकांना इथून पळून जावे लागेल, असे सहर शेख म्हणाली.

पुढे बोलताना सहर शेख म्हणाली, पाच वर्षांनी मुंब्रा परिसरात सगळे एमआयएमचे उमेदवार निवडून येतील, ही मजलिसची ताकद आहे. ही ताकद आपल्याला अल्लाहने दिली आहे. मुंब्रा परिसरात नोटाला जास्त मतदान झाले आहे. मुंब्रा परिसरात तुतारीच्या उमेदवारापेक्षा नोटाला जास्त मत पडली आहेत. शेर के बच्चे को हराने के लिए पुरी की पूरी गिधाड की टीम की फौज तैनात करनी पडी. बिलकुल काम ही नही आया, अशी जहरी टीका सहर शेखने केली आहे. यावेळी सभेत बोलताना युनूस शेख यांनी देखील जोरदार हल्लाबोल केला आहे. ते म्हणाले, जितेंद्र आव्हाडला मी जेजे नाव ठेवले आणि तो महाराष्ट्रात लोकप्रिय झाला. अल्लाहतालाने माझ्या मुलीला 'हिजाबवाली बेटी' म्हणून लोकप्रिय केले. जितेंद्र आव्हाड यांनी इथून पुढे कोणत्याही मुलीच्या भविष्याशी खेळू नये. नाहीतर आमचा समाज एकत्र येऊन विकेट कशी पाडतो, हे बघितले ना. तू माझ्या मुलीला उमेदवारी नाकारलीस, मी आता माझ्या मुलीला एमआयएममधून निवडून आणले आहे. जर प्रभाग क्रमांक 30 मध्ये कुठलाही अडथळा निर्माण केला तर इथून काय-काय निघणार, याचा तू विचार सुद्धा करु शकत नाहीस. निवडणूक झालेली आहे मी सर्वांना माफ केले आहे. परंतु जे जे म्हणजे 'झुठा जितेंद्र आव्हाड' यांना कदापि माफ करणार नाही, प्रभाग क्रमांक 30 मध्ये जर कधी फिरताना दिसला तर तुला दाखवतो, असा थेट इशाराच शेख यांनी दिला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २१ जानेवारी २०२६


## किनगाव राजा सबस्टेशन अंतर्गत रात्री ‘एक तार’ वीज द्या; अन्यथा आंदोलन - राष्ट्रवादीचा इशारा

**बुलढाणा (महेश मुंढे) :** तालुक्यातील किनगाव राजा सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या परिसरात वन्य प्राण्यांचा उपद्रव अक्षरशः वाढला असून, रोही, डुक्कर व इतर जंगली प्राण्यांमुळे शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. मात्र, या गंभीर समस्येकडे महावितरण प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने आक्रमक पवित्रा घेतला आहे.या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष विनायक भानुसे पाटील यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता सिंदखेडराजा यांना दिनांक १९ जानेवारी रोजी निवेदन देत लोडशेडिंगच्या वेळेत रात्री शेतामध्ये किमान ‘एक तार’ विद्युत पुरवठा सुरू करण्याची ठाम मागणी केली आहे.रात्री अंधार, शेतकरी असुरक्षितसध्या रात्रीच्या वेळेस शेतामध्ये विद्युत पुरवठा नसल्याने शेतकरी प्रकाशाची कोणतीही व्यवस्था करू शकत नाहीत. याच संधीचा फायदा घेत वन्य प्राणी शेतात घुसून पिकांची नासधूस करत आहेत. अनेक शेतकऱ्यांचे अर्थकारण कोलमडले असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे शेतकरी हतबल झाले आहेत.‘एक तार’ वीज सोडण्याची शेतकऱ्यांची माफक मागणीरात्री एक तार विद्युत पुरवठा दिल्यास शेतात लाईट लावून वन्य प्राण्यांना परावृत्त करता येईल, तसेच पिकांचे मोठे नुकसान टाळता येईल, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. ही मागणी अत्यंत माफक आणि व्यवहार्य असतानाही महावितरणकडून दिरंगाई होत असल्याने संताप वाढत आहे.आंदोलनाचा इशारामहावितरणने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास शेतकऱ्यांना सोबत घेऊन महावितरण कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा राष्ट्रवादी काँग्रेसने दिला आहे. आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी महावितरण प्रशासनाची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.प्रशासन जागे होणार का?शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर महावितरण तातडीने निर्णय घेणार की नेहमीप्रमाणे फक्त आश्वासनांवरच बोळवण होणार, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

## महाविद्यालयीन तरुण मुलगी घरातून एक लाख रुपये घेऊन फरार



**दौलताबाद (जावेद अहमद) :** भीमनगर येथील विशाखा अर्जुन मोरे यांनी दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे की त्यांची मुलगी दीक्षा अर्जुन मोरे वय१९ वर्ष ही दि १७ जानेवारी शनिवारी रोजी सायंकाळी सहा वाजता माझी मुलगी दिक्षा घरी होते आई स्वयंपाक करत होती. त्याच वेळी मुलगी दिक्षा ही कोणास काही एक न सांगता सोबत कॉलेजचो बॅग घेउन घराबाहेर निघून गेली आईला वाटले की ती मैत्रीनीकडे गेली असेल परतु बराच वेळ झाला ती घरी आली नाही, म्हणून आम्ही तिचा आजूबाजूला शोध घेतला असता. ती कोठेही मिळून आली नाही तिचे वर्णण दिक्षा अर्जुन मारे वय १९ वर्षे व्यवसाय शिक्षण रा भिमनगर दौलताबाद ता जि छत्रपती संभाजीनगर रंग-गोरा,चेहरा-गोल, शरीर बांधा मध्यम केस काळे लांब,नाक-सरळ, उंची-बार फुट पाच इंच, अंगात-गुलाबी रंगाचा जाळीदार पंजाबी ड्रेस,पायात चप्पल, कानात सोन्याचे फुल, मराठी हिन्दी बोलते, सोबत-कॉलेजची काळ्या रंगाची बंग त्यामध्ये एक लाख रूपये, आधार कार्ड, पॅन कार्ड ही तरुणी कोणास आढळल्यास दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये संपर्क साधावा पुढील तपास पोलीस अंमलदारव्ही. एस. खंडागळे हे करत आहे.

## जिंतूर तालुक्यात ११ हजारांहून अधिक शेतकरी दुष्काळी अनुदानापासून वंचित



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यात मागील खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने बाधित शेतकऱ्यांसाठी दुष्काळी व अतिवृष्टी अनुदान जाहीर केले होते. मात्र या अनुदानाच्या वाटपात मोठ्या प्रमाणावर दिरंगाई झाल्याने तालुक्यातील तब्बल ११ हजार ११६ शेतकरी अद्यापही अनुदानापासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महसूल विभागामार्फत तलाठ्यांच्या सहाय्याने गावपातळीवर शेतकऱ्यांकडून आधार कार्ड, बँक पासबुक व मोबाईल क्रमांक संकलित करण्यात आले होते. तालुक्यात एकूण ७२ हजार १८२ शेतकरी बाधित असल्याची नोंद असून, यापैकी ६१ हजार ०१९ शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा झाले आहे. मात्र उर्वरित ११ हजार ११६ शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्यापही अनुदान वर्ग झालेले नाही. सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जिंतूर, आडगाव (बाजार), बोरी, चारठाणा, दुधगाव, येलदरी व बामणी या महसूल मंडळांतील शेतीचे मोठे नुकसान झाले होते. शासनाने हेक्टरी ८ हजार ५०० रुपयांचे अनुदान जाहीर करून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्याची घोषणा केली होती. मात्र दिवाळी उलटून अनेक महिने झाले तरीही अनेक शेतकऱ्यांना अनुदान मिळालेले नाही. शेत क्षेत्र सामायिक असणे, खातेधारकाचा मृत्यू, नावातील त्रुटी, केवायसी संदर्भातील अडचणी अशा विविध कारणांमुळे अनुदान प्रलंबित असल्याचे सांगितले जात आहे. अनेक शेतकऱ्यांनी आवश्यक दुरुस्त्या करूनही त्यांच्या खात्यावर रक्कम जमा झालेली नाही. त्यामुळे शेतकरी तहसील कार्यालयाच्या फेऱ्या मारत असून, ‘अनुदान डीबीटीमार्फत जमा होईल’ एवढेच उत्तर मिळत असल्याने संताप वाढत आहे.एकीकडे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असताना, महसूल प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे अनुदान रखडल्याचा आरोप होत आहे. प्रलंबित अनुदान तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करावे, अशी जोरदार मागणी तालुक्यातील शेतकरी वर्गाकडून करण्यात येत आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २१ जानेवारी २०२६


## पतंग

पतंग जाई
उंच आकाशी
लपंडाव खेळेन
काळ्या ढगांशी

ढगा सोबत
गाईन गाणी
बरसू नकोस
सांगेन कानी

ढिल देऊनी
फिरवू फिरकी
पतंग घेई
मजेत गिरकी

उंच भरारी
आकाशी घेई
पतंग माझा
जो तो पाही

नायलॉन धागा
आपण टाळू
मांज्या शिवाय
पतंग खेळू



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## नेतृत्व

नेतृत्व असावे,सदा संयम सुशील.
संकट काळात, असावे धैर्यशील.

नेतृत्व असावे,सर्वांना तारणारे.
संकट प्रसंगी, शत्रूला जिंकणारे.

नेतृत्व म्हणजे, न्याय समानता.
न्याय करावे,कोणाला न जुमानता.

नेतृत्व म्हणजे, विकासाचा मार्ग.
सर्वांना दिसावे, जगतांना सन्मार्ग.

नेतृत्व म्हणजे, सर्वांचा सन्मान.
करणार नाही, कोणाचा अपमान.



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

# मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेत बाल आनंद नगरी उत्साहात





**छत्रपती संभाजीनगर :** मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा केंद्र मुकुंदवाडी शाळेत विद्यार्थ्यांना व्यवहारिक व व्यावसायिक ज्ञान मिळावे यासाठी मंगळवार दिनांक 20 जानेवारी 2026 रोजी आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले. या आनंदनगरीचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्या श्रीमती निशा देवदत्त मगरे आणि शाळेचे मुख्याध्यापक माननीय श्री पी पी शिंदे सर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पाणीपुरी,भेळ, पॅटीस, वडापाव, फळे, ढोकळा समोसे,चाट,पापड,पॉपकॉर्न, मसाला पुरी, धपाटे, इडली चटणी आणि थंडगार लिंबू सरबत अशा नवरसांचे स्टॉल्स लावले होते. विशेष म्हणजे सर्व पदार्थ विद्यार्थ्यांनी स्वतः घरी तयार केले होते. दिवसभरात विद्यार्थ्यांनी एकूण 5,500 ₹ कमावले. यावेळी विद्यार्थ्यांच्या पालकांनी आणि शाळेतील सर्व शिक्षक श्री राठोड सर, श्री वाघ सर, श्री राजपूत सर श्री चव्हाण सर, श्री मडके सर, श्री पठाण सर,श्रीम माळोदे मॅडम, श्रीम तारो मॅडम, श्रीम भारद्वाज मॅडम, श्रीम भिंगोले मॅडम, श्रीम शिंदे मॅडम, श्रीम फुलंब्रीकर मॅडम बालवाडीताई श्रीम कानडे मॅडम, श्रीम कवठेकर मॅडम यांनी पदार्थ खरेदी करून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला व खरी कमाई विषयी मार्गदर्शन केले.

# चला जाणूया गडकोट, विद्यार्थ्यांनी राबविली पेडकागड स्वच्छता मोहिम



**कन्नड (अरुण थोरात) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कळंकी ता.कन्नड शाळेतील विद्यार्थ्यांनी दि.19 जानेवारी रोजी तालुक्यातील ऐतिहासिक पेडकाकिल्ला येथे निसर्गसहल काढत गड स्वच्छता मोहीम राबविली. सातमाळ डोंगर रांगेतील सुवर्णपालेश्वर उप रांगेत असलेला वऐतिहासिक यादव साम्राज्यातील विज्जलगड प्रांताचा टेहाळणी व विश्राम नाका असलेला पेडकाकिल्ला धार्मिक, इतिहास व निसर्गप्रेमींचे श्रध्दास्थान आहे. येथील निसर्गम जैवविविधता अनुभवण्यासाठी साठी दरवर्षी हजारो दुर्गप्रेमी येथे भेट देतात.सोमवारी जि.प.प्राशा.कळंकी येथील विद्यार्थ्यांनी येथे निसर्गसहल राबवलीया मोहिमे दरम्यान चढाई केल्यानंतर किल्ल्याची माहिती, तत्कालीन काळातील हेरगिरी संदर्भात किल्ल्याचे महत्व व गडकिल्ल्यांच्या संवर्धनाचे महत्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. तसेच किल्ल्यावरील गढी बुरुछ, तटबंदी परिसर, पुरातन पाण्याची टाके व गणपती व पेडकाई माता मंदिर परिसराची विद्यार्थ्यांनी स्वच्छता केली, विखुरलेला प्लास्टिक कचरा जमा करुण जंगला बाहेर नेऊन विल्हेवाट लावली. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जयराम पथवे यांनी मुलांना किल्ल्याची माहिती दिली. मोहिमेदरम्यान सर्व शिक्षक, व्यवस्थापन समिती व स्थानिक आदिवासी बांधवानी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची खबरदारी घेतली.सदर मोहिमेसाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रमेश थोरात, प्रमोद थोरात, समाधान थोरात, रमेश साळुंके, मुख्याध्यापक राहुल राठोड, शिक्षक दुर्गसेवक दादासाहेब पोकळे, बालाजी चोपणे, विजय आडे, विशाल ठाकरे, शिवाजी सारंग यांनी मार्गदर्शन केले. दिवसभरात पेडकागड व परिसरात आनंदाने घालवून ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्याचा मोलाचा धडा घेत शिवरायांच्या नावाचा जयघोष करत, एक अनोखी व अविस्मरणीय निसर्गसहल आनंदात पार पडली.


प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103



## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २१ जानेवारी २०२६


## शिक्षणा शिवाय आदिवासी समाजाची प्रगती नाही - आमदार दौलत दरोडा



**कन्नड (अरुण थोरात) :** आदिवासी ठाकर समाज बांधवांनी आपल्या मुलांना चांगले शिक्षण देऊण समाजाची प्रगती करावी असे अवाहन महाराष्ट्र राज्य अनुसुचित जमाती कल्याण समिती चे अध्यक्ष तथा शहापूर चे आमदार दौलत दरोडा यांनी केले आहे. ते दि. 20 जानेवारी रोजी अंबाळा ता.कन्नड येथे आयोजित आदिवासी जनजागृती मेळावा प्रसंगी बोलत होते.सह्याद्री आदिवासी ठाकूर,ठाकर समाज उन्नती मंडळ महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या 21 व्या वर्धापन दिनानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोमनाथ मेंगाळ यांची उपस्थित होती. आपला आदिवासी समाज डोंगर दर्यात राहतो. आधूनिक समाजा प्रमाणे प्रगती साधण्यासाठी शिक्षित होणे गरजेचे आहे. समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करील असे आश्वासन आ. दरोडा यांनी यावेळी दिले. प्रास्ताविक भाषणात राज्य संपर्क प्रमुख जानू हिरवे म्हणाले की, महाराष्ट्रातील आठ जिल्ह्यात संघटनेचे रोपटे पेरले असून आपण संभाजीनगर जिल्ह्यातील ठाकर समाजाचे जातीचे दाखले मिळवून दिले. एकत्र आल्यास आपल्या मागण्या पुर्ण करुण घेऊ शकतो. यासाठी संघटीत व्हावे. तुळशीराम कातोरी यांनी आपल्या मनोगत सांगितले की, आपली संघटना खेडोपाडी, घराघरात पोहचली पाहिजे. सध्या जातीपातीचे राजकारण सुरु आहे. आपल्या समाजातील तरुणाईने कोणाचीही हुजरेगी करु नये. युवकांनी समाजाच्या प्रश्नांसाठी एकत्र आले पाहिजे. आपल्या पुर्वजांनी काय केल आपण काय करतो याचा विचार करावा. समाजाला पुढे न्यायचे असेल तर मुलांना शिक्षण दिले पाहिजे. पुढार्यांच्या मागे फिरण्या पेक्षा समाजाच्या भल्या साठी फिरावे. असे अवाहन केले. तुळशीराम कातोरे, इंजी.सुधाकर मेंगाळ पांडू कडाळे, मोखाड चे मा.सभापती एकनाथ झुगरे यांनी ही मनोगत व्यक्त केले. संघटनेच्या वतीने सत्कारमुर्ती- जाणू हिरवा, डॉ भावराव उघडे, सुखदेव मेंगाळ, सिताबाई पथवे, मधुकर गावंडे, अरुण थोरात, मधुकर मेंगाळ, भावराव आवाले, बुधा मधे, दामू मेंगाळ, विष्णु मेंगाळ आदी पाहण्यांचा सत्कार करण्यात आला. जि.प.प्राशा. अंबाळा, निरगुडी येथील मुलांनी नृत्यसादरिकरण केले. नवनियुक्त ग्रामविकास अधिकारी प्रताप पथवे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन पांडू कडाळे यांनी केले. याप्रसंगी कन्नड चे मा.सभापती खेमा मधे, आंबाळा सरपंच सखाराम भुतांबरे, अलकाताई मेंगाळ, काळू पथवे, गंगाराम आगीवले, दत्तु सोनावणे, सोमा आगीवले, शिवराम मेंगाळ, लताबाई भुतांबरे, रतन मधे, दुबळीराम पथवे, आदींसह शेकडो समाज बांधव उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी मायबापांच्या कष्टाची जाणिव ठेवावी - कवी ज्ञानेश्वर गायके



**कन्नड (अरुण थोरात)** मी तुमच्या सारखाच ग्रामीण भागातील या महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आहे. या महाविद्यालयाने माझ्यावर वाङ्मयीन व सामाजिक संस्कार केले. दिवसभर मजुरी करून रात्री अभ्यास करायचो. आईवडिलांनी अतोनात कष्ट करून मला घडविले. आपणही आपल्या जीवनात या महाविद्यालयांतील गुरुजनांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेऊन जीवनात यशस्वी होऊन नावलौकिक मिळवावा. खूप मोठे व्हा ! परंतु मायबापांच्या कष्टाची जाणिव ठेवा असे प्रतिपादन कवी ज्ञानेश्वर गायके (माजी विद्यार्थी) यांनी केले. (ता. 20 ) येथील शिवाजी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेह संमेलनाचे उदघाटन कवी ज्ञानेश्वर गायके व कवी लक्ष्मण वाल्डे यांच्या हस्ते संपन्न झाले. अद्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय भोसले होते. तर मंचावर फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, प्रभारी प्राध्यापक डॉ. रामचंद्र झाडे, संयोजन समितीचे डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. उदय डोंगरे , डॉ. के. एल. भानुसे, डॉ. प्रकाश महाजन , डॉ. शिवाजी हुसे यांची उपस्थिती होती. दिप प्रज्वलन करून उदघाटन करण्यात आले. यावेळी लक्ष्मण वाल्डे म्हणाले की, माझ्या जडणघडणीत या महाविद्यालयाचा फार मोठा वाटा आहे. आपणही खूप अभ्यास करून जिवनात मोठे व्हा ! अशक्य असे काहीच नाही. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांचे सातत्याने मार्गदर्शन मिळाले त्यामुळेच साहित्य क्षेत्रात चांगले काम करता आले. ज्ञानेश्वर गायके व लक्ष्मण वाल्डे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गाय के यांनी माझ्या कन्नडच्या भूमित ही तर लक्ष्मण वाल्डे यांनी कन्नड आमचे साहित्यिकांचे गाव या कविता सादर करून वाहवा मिळवली. प्रास्ताविक डॉ. के. एल. भानुसे यांनी केले. स्नेहसंमेलनाचे महत्व विशद करून सहभागी होण्याचे आवाहन केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केला. ते म्हणाले महाविद्यालय हे तुमच्या सर्वांगीण विकासासाठी मोठे व्यासपीठ आहे. अभ्यासा बरोबरच आपण विविध उपक्रमात सहभागी होऊन व्यक्तिमत्वाचा विकास साधावा . स्नेह संमेलन त्याचाच एक भाग आहे. विद्यार्थ्यांने जिवनात खूप मोठे व्हावे आपल्या आवडत्या क्षेत्रात झोकुन काम केले तर यश हमखास मिळते.असे मत त्यांनी व्यक्त केले.आनंदनगरीने सुरुवात : दुपारी आनंद नगरीने स्नेहसंमेलनाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग घेऊन आनंद घेतला. ३५ स्टॉल सहभागी झाले. विद्यार्थी व प्राध्यापक यांनी आनंदनगरीचा आस्वाद घेतला. त्यानंतर सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. के. एल. भानुसे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी आपला कलाविष्कार सादर केला. त्यात लावणी, भावगिते, नृत्य, समुह नृत्य, देशभक्तीपर गिते, सादर करून रंगत आणली. सांस्कृतिक कार्यक्रमाचे उदघाटन प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या हस्ते संपन्न झाले. विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येनी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. अतिश मेहेत्रे यांनी केले तर आभार प्रभारी प्राध्यापक डॉ. रामचंद्र झाडे यांनी मानले.

## बौद्धिक संपदा अधिकार, पेटंट आणि डिझाईन या विषयावर ऑनलाइन राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न




**पाटोदा प्रतिनिधी :** जयभवानी महाविद्यालय पाटोदा आणि बलभीम महाविद्यालय बीड येथील अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बौद्धिक संपदा अधिकार, पेटंट आणि डिझाईन फायलिंग या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न झाली.या कार्यशाळेचा उद्देश बौद्धिक संपदा हक्कांबाबत जनजागृती करणे हा होता.या कार्यशाळेमध्ये राजीव गांधी राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार व्यवस्थापन संस्था नागपूर येथील सहाय्यक संचालक श्री. कुमार राजू यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये त्यांनीIPR, पेटंट, औद्योगिक रचना (Industrial Designs), ट्रेडमार्क, भौगोलिक संकेतांक (Geographical Indication) आणि कॉपीराइट या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी कायदेशीर बाबी सोप्या भाषेत मांडल्या. या कार्यशाळेचे अध्यक्ष बलभीम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर संतोष उंदरे सर हे होते. या कार्यशाळेमध्ये प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर, प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे सर, उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब कोकाटे सर, आक्यूएसी समन्वयक प्रा. विनोद किर्दक यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन आक्यूएसी समन्वयक डॉ. अनिल चिंधे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. सोमेश्वर बाबर यांनी केले. पाहुण्याचा परिचय डॉ. गोवर्धन वायसे यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ. शिवाजी काकडे यांनी मानले. या कार्यशाळेमध्ये मोठ्या संख्येनेविद्यार्थी, संशोधक व प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.प्रश्नोत्तर सत्रामुळे सहभागींच्या शंका निरसनास मदत झाली. अशारीतीने ही कार्यशाळा नवकल्पना व संशोधनाला चालना देणारी ठरली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २१ जानेवारी २०२६

## कुठे 'वॉटर पार्क'चा थरार, तर कुठे इतिहासाची सफर; इकरा पब्लिक स्कूलची अविस्मरणीय सहल!



**जळगाव :** इकरा पब्लिक स्कूलने आपल्या विद्यार्थ्यांसाठी एकाच वेळी दोन वेगवेगळ्या सहलींचे आयोजन करून एक अनोखा 'फन डे' साजरा केला, ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या एका गटाने लोणावळ्यातील 'वेट एन जॉय' वॉटर पार्कमध्ये 'टॉर्नाडो' सारख्या रोमांचक राईड्सचा थरार अनुभवत जलक्रीडेचा आनंद लुटला,तर दुसऱ्या गटाने छत्रपती संभाजीनगरमधील ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन इतिहासाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. "ही आतापर्यंतची सर्वोत्तम सहल आहे" अशा शब्दांत वॉटर पार्कला गेलेल्या मुलांनी आपला उत्साह व्यक्त केला, तर ऐतिहासिक सहलीतील विद्यार्थ्यांनी "आता इतिहास खरोखरच छान वाटू लागला आहे" अशा भावना व्यक्त करत या सहलीचे शैक्षणिक महत्त्व अधोरेखित केले. आपल्या विद्यार्थ्यांचा हा आनंद पाहून आणि त्यांच्या चेहऱ्यावरील हसू पाहून शिक्षकांनी देखील शाळेच्या नियोजनाचे सार्थक झाल्याचे समाधान व्यक्त केले, ज्यामुळे हा 'फन डे' खऱ्या अर्थाने यशस्वी ठरला.

## प्रणिती ताईंनी कार्यकर्त्यांचे वाटोळे केले : जयकुमार गोरे



**सोलापूर :** महानगरपालिकेत भाजपने 87 जागा जिंकत स्पष्ट बहुमताचा आकडा पार केला. तर दुसरीकडे सोलापूरमध्ये कॉंग्रेस पक्षाचे दोन खासदार असूनही पक्षाला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. यावरून कॉंग्रेस नेतृत्वावर टीका होताना दिसत आहे. भाजप नेते तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्यावर बोचरी टीका केली आहे.

प्रणिती शिंदे यांनी जयकुमार गोरे हे कॉंग्रेसचे कार्यकर्ते होते, अशी आठवण करून दिली होती. यावर प्रत्युत्तर देताना जयकुमार गोरे म्हणाले, मी कॉंग्रेसचा होतो हे सांगण्यासाठी प्रणिती शिंदेंच्या सर्टिफिकेटची आवश्यकता नाही. प्रणिती ताईंनी सुशीलकुमार शिंदे साहेबांनी मोठी केलेली कॉंग्रेस संपवण्याचे काम केले. आयुष्यभर कष्ट करून ज्या कार्यकर्त्यांना शिंदे साहेबांनी सोबत घेतले, त्या कार्यकर्त्यांचे वाटोळे प्रणिती शिंदेंनी केले, अशी टीका गोरे यांनी केली.

पुढे बोलताना जयकुमार होरे म्हणाले, ज्यावेळी कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांना त्यांची गरज होती, तेव्हा त्या त्यांना वाऱ्यावर सोडून गेल्या. त्यामुळे दोन नगरसेवक आल्यावर देखील समाधान वाटत आहे. 87 नगरसेवक आलेल्या भाजपवर त्या टीका करत आहेत. मी बोललो तर त्यांना लागायचे कारण नाही. एवढा मोठा पराभव झाला तर ते स्वीकारायला हवे. पालकमंत्र्यांनी गल्ली बोळात जाऊन पैसे वाटले वगैरे त्यांनी म्हटले, त्यावेळी त्या सन्मानाने बोलल्या होत्या का? तुम्ही दुसऱ्याचा सन्मान करा मग तुमचाही सन्मान होईल, असा पलटवार गोरे यांनी केला.

## उच्च शिक्षण देणारी महाविद्यालये उद्योजक निर्मिती ची केंद्र व्हावीत - श्री. हेमंत वाघमारे



**नागपूर (चंद्रशेखर पाटील) :** "एक तरुण जेव्हा शासकीय किंवा निमशासकीय नोकरी वर लागतो तेव्हा केवळ त्याची आणि त्याच्या कुटुंबाची प्रगती होते पण जेव्हा एक उद्योजक घडतो तेव्हा हजारो लोकांना रोजगार मिळतो आणि त्यांची आणि अनेक कुटुंबाची आर्थिक आणि सर्वांगीण प्रगती होते. आणि एक सक्षम समाज घडतो. त्यामुळे महाविद्यालयानी कौशल्य विकास आणि उद्योजकते वर भर द्यावा. आपल्या विद्यार्थांची कौशल्ये आणि कल लक्षात घेऊन तसें उपक्रम राबवून जास्तीत जास्त उद्योजक कसे निर्माण होतील यासाठी प्रयत्न करावेत. नव्हे उच्च शिक्षण देणारी महाविद्यालये ही उद्योजक निर्मितीची केंद्र व्हावीत." असे स्पष्ट मत नागपूर विभागाचे विभागीय अधिकारी आणि एम. सी. ई. डी. केंद्र प्रमुख श्री. हेमंत वाघमारे यांनी व्यक्त केले. ते स्थानिक डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू एस कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात संस्थेचे दिवंगत संस्थापक आणि माजी आमदार डॉ. मधुकरराव वासनिक यांच्या जयंती निमित्य आयोजित उद्योजक मेळावा आणि सांस्कृतिक महोत्सवाचे उदघाटक म्हणून बोलत होते. डॉ. वासनिक यांना आदरांजली देताना डॉ. साहेबांशी माजी विद्यार्थी म्हणून असलेले ऋणानुबंध आणि महाविद्यालयातील विविध कार्यक्रमातील सहभाग त्यांनी सभागृहासमोर कौटुंबिक भावनेतून व्यक्त केला. या उदघाटन सत्राचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे यांनी भूषविले. संस्थेच्या सदस्य प्रा. निशा वासनिक, उपप्राचार्य प्रा. गामिनी मेश्राम, सांस्कृतिक समिती समन्वयक डॉ. चंद्रशेखर पाटील, प्रा. रेखा बावनकुळे यांची याप्रसंगी विशेष उपस्थिती होती. प्रा. निशा वासनिक यांनी आपल्या वक्तव्यातून उद्योजक मेळावा आणि सांस्कृतिक आणि क्रीडा महोत्सवाच्या सुनियोजित आयोजनासाठी आणि यशस्वीते साठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी प्राचार्य डॉ. प्रज्ञा बागडे यांनी आपले अध्यक्षीय विचार मांडताना " महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या युवक आणि युवतीनी स्पर्धा परीक्षाच्या अपयशानी खचून न जाता स्टार्ट अप, स्वयंरोजगार आणि उद्योजक तेचि वाट निवडावी आणि तशी जिद्द मनात बाळगावी. आणि यशस्वी उद्योजक म्हणून समाजात आपली प्रतिमा घडवावी. " असे प्रतिपादन केले. दि. 19 आणि 20 जानेवारी 2026 या दोन दिवस चालणाऱ्या या उद्योजक मेळाव्यात शहरातील आणि ग्रामीण भागातील अनेक उद्योजक आपल्या उत्पादनासह मोठया संख्येने सहभागी झालेले आहेत. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी आणि विद्यार्थिनी नी देखील स्वतः बनविलेले खाद्य पदार्थ आणि विविध वस्तू विक्रीसाठी ठेवलेल्या आहेत. उद्योजक मेळावा आणि सांस्कृतिक महोत्सवाच्या आयोजनामागची प्रास्ताविक भूमिका प्रा. गामिनी मेश्राम यांनी विषद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रणाली चव्हाटे यांनी केले. सर्व मान्यवर, उपस्थित श्रोते आणि उद्योजक मेळाव्यात आपली विविध उत्पादने प्रदर्शन आणि विक्रीसाठी आणलेल्या उद्योजकांप्रती कृतज्ञता आणि सर्वांचे आभार महिला समितीच्या समन्वयक डॉ. अमृता डोर्लिकर यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी महाविद्यालय सांस्कृतिक समिती आणि उद्योजक मेळावा आयोजन समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येत विद्यार्थी उपस्थित होते.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २१ जानेवारी २०२६


## कहार ही प्राचीन बोलीभाषा तिचे संवर्धन व जतन होणे काळाची गरज - प्रा. डॉ. दिलीप बिरुटे



**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** काहार ही प्राचीन बोलीभाषा असून तिचे संवर्धन ,जतन व अभ्यास होणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन कहार बोलीचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा.डॉ.दिलीप बिरुटे यांनी जेईएस महाविद्यालय जालना येथे "बोलीचा जागर" या कार्यक्रमात केले.मराठी भाषा पंधरवडा निमित्त महाराष्ट्र शासन मराठी विभाग व जे ई एस महाविद्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने "बोलीचा जागर" या कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.नितीन गादेवाड हे होते, प्रमुख अतिथी म्हणून कहर बोलीचे अभ्यासक प्रा.डॉ.दिलीप बरुटे होते, व मराठी भाषा संचनालायाचे सहाय्यक संचालक श्री शरद यादव, व प्रा.आनंद गांगणक होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री होते. यावेळी व्यासपीठावर मराठी भाषा विभाग प्रमुख प्रा. डॉ. यशवंत सोनूने प्रा. दीपक लिंबे , डॉ. गणेश पांढरे, श्री पांडुरंग गहिरे, श्री आसाराम पुंगासे डॉ.कन्नुलाल विटोरे, सोनाली गव्हाणे आदींची प्रमुख उपस्थिती होती."काहर"ही महाराष्ट्रातील दुर्लक्षित बोलीभाषा असून यामध्ये काहर भोई समाजाचा समावेश आहे. गोदावरी नदीच्या उगमापासून तर महाराष्ट्राच्या नांदेड जिल्ह्यात पर्यंत गोदाकाठी "काहार" हा समाज वास्तव्यास असून, या दुर्लक्षित बोलीचा जागर व्हावा ,त्याची माहिती व ओळख महाराष्ट्रातील मराठी माणसापर्यंत पोहोचावी यासाठी या एकदिवसीय कार्यक्रमाचे शासनातर्फे आयोजन जेईएस महाविद्यालय जालना येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा .डॉ. यशवंत सोनूने यांनी केले. बोलीभाषा जीवनामध्ये महत्त्वाची असून जशी मानवाला श्वासाची गरज असते तसेच बोलीभाषेचे मानवी जीवनामध्ये महत्त्व आहे बोली टिकली तरच भाषा टिकतील, बोलीभाषा चे जतन केले पाहिजे असे डॉ. सोनूने यांनी सांगितले.यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बोलताना डॉ. नितीन गादेवाड म्हणाले की, दर बारा कोसावर भाषा बदलते, भाषेवरून माणूस ओळखला जातो,बोलीभाषा ही त्या समुदायाची मातृभाषा असते तीच खरी त्या लोकांची ओळख असते. अनेक बोलीतून मराठी भाषा विकसित झालेली आहे. मातृभाषेतून शिक्षण दिल्यास ती लवकर अवगत होते, असेही डॉ. गादेवाड यांनी सांगितले.या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्रा. आनंद गागनक म्हणाले की, राज्यातील ३६जिल्ह्यांमध्ये बोलीभाषांचा जागर हा कार्यक्रम साजरा होत असून मराठी भाषेतून रोजगाराच्या१५० संधी उपलब्ध होत आहेत. मराठी भाषा ही मुख्य नदी असून तिला अनेक बोलीभाषाचे ओढे मिळालेले आहेत. त्यामुळेच मराठी भाषा समृद्ध झाली असून, बोलीच्या विविधतेमुळे भाषेचे सुलभीकरण होते. यामुळे आज मराठी भाषा समृद्ध झाली आहे. कहर बोली भाषा टिकावी व तिचे जतन व्हावे तिचा विकास व्हावा त्यासाठी या बोलीभाषेतील लोकसाहित्याचा अभ्यास व्हावा, "बोली वाचवा भाषा टिकवा" या भूमिकेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचेही प्रा.गांगणाक यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी कहार बोलीचे अभ्यासक प्रा.डॉ. दिलीप बिरुटे बोलताना म्हणाले की, कहार बोली ही बुंदेलखंडातून महाराष्ट्रात आली असून कहार बोली मध्य प्रदेश माळवा ,खानदेश पुढे मराठवाडा असा तिचा प्रवास झाला आहे. कहार बोलीच्या अनेक लोककथा असून, त्या बुंदेलखंडी हिंदी भाषेत व कहार बोलीत आहेत. कहार हे पूर्वीच्या काळी राजे~राणी महाराजांच्या पालखी घेऊन जाण्याचे काम करत असत. राजाला आपली भाषा समजू नये म्हणून ते सांकेतिक भाषेत काहार बोलीत एकमेकांशी संवाद साधत. अमेरिकन मासिक होलकर मध्ये 1968 सारी कहार लोकांच्या इतिहासावर लेख प्रसिद्ध झाला आहे, गोर+ कहार डोली वाहण्याचे काम करत होते. ते राज दरबारी काम करत होते परंतु ते अस्पृश्य नव्हते. भाल दरबारातील भाषा व दरबारी मंडळी कार बोली बोलत होते. अर्ध मागधी भाषेची बुंदेल बोलीभाषा असून, बुंदेल बोलीची काहार ही बोली आहे. शंकर-पार्वतीची कथाही काहार सांगून, इतिहासही उलगडून दाखवला. कार बोलतील वाक्प्रचार म्हणी लोककथा शब्दार्थ याचेही दर्शन त्यांच्या भाषनातून झाले , कार समाजाच्या परंपरा आचारधर्म लोकधर्म याविषयीची माहिती प्रा. बिरुटे यांनी सांगितली.कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप करताना प्राचार्य डॉक्टर गणेश अग्निहोत्री म्हणाले की कारवली ही प्राचीन असून त्यांच्या साहित्यावर अभ्यास झाला पाहिजे तसेच इंडोलॉजी भाषावरअभ्यास होणे ,आज गरजेचं आहे. जे लोक बोली भाषेतून बोलतात त्यांचे आरोग्य चांगले राहते जे प्रमाण भाषेतून बोलतात त्यांना मात्र आरोग्याच्या समस्या आज दिसतात असेही विनोदी वक्तव्य डॉ.अग्निहोत्री यांनी केले. महाराष्ट्रातील कहार बोली सारख्या दुर्लक्षित बोलींचं संवर्धन व अभ्यासहोणे ही काळाची गरज आहे, असेही डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.मुख्य कार्यक्रमांतर कार समाजातील जस गीत गायन तसेच लोकगीतांचे सादरीकरण झाले,काही कविताही काहार समाजातील तरुणांनी सादर केल्यात. सोनाली गव्हाणे या युवा कवयित्रीने "काहार भाषा आपलो बोलत जावो, आपलो कहार भाषा शान शे.. " ही दर्जेदार कविता कहार बोली तून सादर केली., यावेळी गोंदी शहागड पाथरवाला संभाजीनगर तसेच मराठवाड्यातून गोदाकाठचे अनेक कार समाजातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. बाळकृष्ण विटोरे ,प्रा.डॉ.राजेंद्र सोनवणे प्रा. डॉ.मोहिते प्रा. बिन्नीवाले, प्रा. खंडागळे, प्रा. महेर, प्रा. मुंडे आदीनी विशेष परिश्रम घेतलेत. कार्यक्रमाचेसूत्रसंचालन प्रा. डॉ. बाबासाहेब वाघ यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.यास्मिन शेख यांनी मानलेत.

## गरुड झेप अकॅडमीचे १७ वे वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा



**दौलताबाद (जावेद अहमद) :** गरुड झेप अकॅडमी अठराव्या वर्षात पदार्पण करत आहे. त्यानिमित्ताने वर्धापन सोहळा (स्नेहमेळावा) मुख्य शाखा वंजारवाडी छत्रपती संभाजीननगर येथे आयोजित करण्यात आला होता.यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून संचालक प्रा. निलेश सोनवणे व त्यांचे आई वडील, गणेश सोनवणे, मीरा मॅडम, प्रणिता मॅडम, प्रा. कुमार सर,प्रा. गवळी , प्रा. डोळस (नाशिक शाखा व्यवस्थापक) प्रा. गाडे ,प्रा. हेमंत सर, प्रा. काळे सर (नगर शाखा), प्रा. चव्हाण सर, सावित्री डकरे मुख्याध्यापिका, मीरा देशपांडे , एकेडमी चे संचालक निलेश सोनवणे यांनी अकॅडमीचे सतरा वर्षातील संघर्षातील अनुभव सांगितला. वर्धापन सोहळ्याच्या निमित्ताने अकॅडमीमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते त्यांचे बक्षीस वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकोत्तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते


